**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास विभाग,बांधकाम भवन,
२५, मर्झबान पथ,फोर्ट , मुंबई - ४०० ००१

usest7.rdd-mh@gov.in

---

क्र. अंकपा-२०२५/प्र.क्र.४४२/आस्था-७ दिनांक :- ११ सप्टेंबर, २०२५

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व),
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

**विषय :- अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक सुधारित धोरणाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींबाबत मार्गदर्शन.**

संदर्भ:- सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्र. अकंपा-१२२५/प्र.क्र.१९४/ म.लो.आ., दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ व दिनांक ११ सप्टेंबर, २०२५

महोदय/महोदया,

संदर्भाधीन परिपत्रकांचे कृपया अवलोकन व्हावे.

सामान्य प्रशासन विभागाने सुधारित अनुकंपा नियुक्ती धोरणानुसार कार्यवाही करताना नियुक्ती प्राधिकाऱ्यांना उद्भवणाऱ्या अडचणींबाबतचे मुद्देनिहाय स्पष्टीकरण संदर्भाधीन दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ व दिनांक ११ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये दिले आहे.

उक्त परिपत्रकातील अनुकंपा मार्गदर्शनाबाबतचे जे मुद्दे जिल्हा परिषद आस्थापनांशी संबंधित आहेत त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाने दिलेले स्पष्टीकरण विचारात घेऊन आवश्यक ती कार्यवाही, ही विनंती.

आपला,

(नितीस स.पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत, निवडनस्ती आस्था-७

**अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक सुधारित धोरणाची अंमलबजावणी करताना व लिपिक-टंकलेखक परीक्षा-२०२३ च्या शिफारशींच्या अनुषंगाने नियुक्ती देताना येणाऱ्या अडचणींबाबत मार्गदर्शन.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: अकंपा-१२२५/प्र.क्र.१९४/म.लो.आ.**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ११ सप्टेंबर, २०२५

**संदर्भ:-** १. शासन निर्णय क्र.अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ., दि.१७ जुलै, २०२५
२. शासन परिपत्रक क्रमांक: अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ., दि.१७ जुलै, २०२५
३. शासन परिपत्रक क्रमांक: अकंपा-१२२५/प्र.क्र.१९४/म.लो.आ., दि.२२ ऑगस्ट, २०२५

**परिपत्रक:-**

अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक सुधारीत धोरण दि.१७ जुलै, २०२५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले असून संदर्भाधीन क्र.२ व ३ येथील परिपत्रकान्वये अनुकंपा नियुक्तीच्या अनुषंगाने उपस्थित होणारे प्रश्न व त्यांची उत्तरे (FAQ) निर्गमित करण्यात आली आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने लिपिक- टंकलेखक परीक्षा-२०२३ अंतर्गत दि.११.०७.२०२५ अन्वये नियुक्ती प्राधिकारी निहाय शिफारशी केल्या आहेत. या शिफारसप्राप्त उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी पूर्ण करण्याच्या सूचना अपर मुख्य सचिव(सेवा) यांच्या दि.२८.०७.२०२५ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व सर्व जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

अनुकंपा नियुक्ती धोरण व लिपिक-टंकलेखक परीक्षा-२०२३ अंतर्गत केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने कार्यवाही करताना नियुक्ती प्राधिकाऱ्यांना उद्भवणाऱ्या अडचणींबाबत उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील स्पष्टीकरण याबाबतचे परिशिष्ट-अ सोबत जोडण्यात आले आहे.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२५०९१११६१०३४३४०७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

**(सुचिता महाडिक)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :-**

१) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव यांना
विनंती करण्यात येते की, त्यांच्या विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालयामधील गट-क व गट-ड च्या सर्व नियुक्ती प्राधिकारी यांना सदर परिपत्रक अवगत करावे.
२) सर्व विभागीय आयुक्त
३) सर्व जिल्हाधिकारी

**शासन परिपत्रक क्र. अकंपा- १२२५/प्र.क्र. १९४/म.लो.आ., दि. ११ सप्टेंबर, २०२५ सोबतचे परिशिष्ट- अ**

सुधारीत अनुकंपा नियुक्ती धोरण व लिपिक-टंकलेखक परीक्षा-२०२३ मधील शिफारशींवरील कार्यवाहीच्या अनुषंगाने उपस्थित मुद्दे व त्यावरील स्पष्टीकरण.

| अ.क्र. | मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्तीसाठी शिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी कोणत्या कागदपत्रांची पडताळणी आवश्यक आहे? | १. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि.३०.०६.२०२२ च्या शासन निर्णयानुसार खेळाडू कोटयातील शिफारसप्राप्त उमेदवाराच्या प्रकरणी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांनी वैध खेळाडू प्रमाणपत्र पडताळणी अहवाल दिल्यानंतरच उमेदवारास नियुक्ती देण्यात यावी.<br>२. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०६.०५.२००४ च्या शासन निर्णयानुसार दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची वैद्यकीय मंडळाकडून तपासणी केल्यानंतरच नियुक्ती देण्यात यावी.<br>३. उर्वरीत दाव्यांची तपासणी/पडताळणी करण्याच्या अधीन शिफारसप्राप्त उमेदवारांना नियुक्ती देण्यात यावी. |
| २ | दि.१७ जुलै, २०२५ पूर्वी गट-क मधील पदाच्या अनुपलब्धतेमुळे उमेदवारास गट-ड मधील पदावर नियुक्ती दिली असल्यास त्या उमेदवारास पुन्हा गट-क मधील पदावर नियुक्ती देण्यासाठी, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सामायिक प्रतिक्षासूचीत सदर उमेदवाराचे नाव पुन्हा समाविष्ट करणे आवश्यक आहे काय ? | **दि.१७ जुलै, २०२५ पूर्वी गट-क मधील पदाच्या अनुपलब्धतेमुळे** उमेदवारास गट-ड मधील पदावर नियुक्ती दिली असल्यास संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याने गट-क मध्ये अनुकंपा नियुक्तीसाठी पद उपलब्ध झाल्यावर संबंधित उमेदवारास गट-क पदावर नियुक्ती द्यावी.<br>यासाठी उमेदवाराचे नाव जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सामायिक प्रतिक्षासूचीत समाविष्ट करण्यासाठी पुन्हा पाठविण्यात येवू नये.<br>दि.१७ जुलै, २०२५ च्या सुधारित धोरणानुसार जिल्हयातील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडील गट-क पदासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडूनच शिफारशी करण्यात येणार असल्याने गट-क वर अनुकंपा नियुक्तीसाठी पदे उपलब्ध होणार असल्याने गट-क च्या प्रतिक्षासूचीवरील उमेदवाराचा प्रतिक्षेचा कालावधी कमी होणार आहे. त्यामुळे सदर तरतूद सुधारित धोरणामध्ये समाविष्ट करण्यात आलेली नाही. त्यामुळे गट-क मधील पदाच्या अनुपलब्धतेमुळे उमेदवारास गट-ड मधील पदावर नियुक्ती दिली असल्यास त्या उमेदवारास पुन्हा गट-क मधील पदावर नियुक्ती देता येणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३ | गट-ड संवर्गातील मृत पदे पुनर्जीवित करण्याची कार्यवाही कालापव्यय करणारी असल्याने प्रतिक्षायादीवरील उमेदवारांना कार्यालयातील मृत पदांच्या मर्यादेत प्रथमत: अनुकंपा नियुक्ती देण्यात यावी. त्यानंतर मृत पदे पुनर्जीवित करण्याचा प्रस्ताव प्रशासकीय विभागाकडे कार्योत्तर मंजूरीसाठी पाठविण्यात यावा, अशी कार्यवाही करता येईल किंवा कसे ? | नियुक्ती प्राधिकारी कार्यालयातील गट-ड संवर्गातील मृत घोषित करण्यात आलेली पदे पुनर्जीवित करण्याचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागास देण्यात आले आहेत.<br>तथापि, **अनुकंपा नियुक्त्या तातडीने करावयाच्या असल्याने एक वेळची बाब म्हणून** मृत पदांच्या मर्यादेत अनुकंपा नियुक्त्या देण्याची कार्यवाही सुरु करुन त्याचवेळी मृत पदे पुनर्जीवित करण्याचा प्रस्ताव प्रशासकीय विभागाकडे कार्योत्तर मंजूरीसाठी पाठविण्याची कार्यवाही करावी. |
| ४ | अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) संवर्गातील सरळसेवेची पदे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरण्याबाबत निर्देश आहेत. पेसा संवर्गातील पदांच्या बिंदूनामावलीबाबत मागासवर्गीय कक्षाकडून मार्गदर्शन प्राप्त झाले नसल्याने सदर पदे अनुकंपा नियुक्तीने भरावयाची झाल्यास त्यांना कोणत्या बिंदूवर दर्शविण्यात यावे ? | अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) संवर्गातील सरळसेवेची पदे मानधन तत्त्वावर भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग/आरक्षण-५ कार्यासनाने दि.०५.१०.२०२४ च्या शासन निर्णयान्वये सूचना निर्गमित केल्या आहेत. अनुकंपा नियुक्ती ही सरळसेवेच्या पदावर देण्यात येणारी नियमित नियुक्ती आहे. सबब, शासन निर्णय दि.०५.१०.२०२४ मधील सूचना विचारात घेता अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) संवर्गातील सरळसेवेच्या पदांवर अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती करता येणार नाही. |
| ५ | गट-क संवर्गामध्ये अनुकंपा नियुक्ती देण्यासाठी २०% पदांची गणना कशाप्रकारे करावी | गट-क च्या पदावर सरळसेवा कोटयात प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या २० टक्के पदांची गणना करताना **निवडसूची वर्षातील रिक्त पदे विचारात घ्यावीत.**<br>२० टक्के पदांची गणना कशी करावी याबाबत शासन निर्णय दि.१७.०७.२०२५ मधील परिशिष्ट-अ मध्ये उदाहरणासह मार्गदर्शन करण्यात आले आहे. |
| ६ | अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक सुधारित धोरणानुसार गट-क व गट-ड मधील पदांवर अनुकंपा नियुक्ती देताना बिंदू नामावलीचे पालन करावे किंवा कसे ? | अनुकंपा नियुक्ती ही सरळसेवेच्या पदावर देण्यात येत असल्याने गट-क व गट-ड मधील पदांवर अनुकंपा तत्त्वावर उमेदवाराची नियुक्ती करताना बिंदू नामावलीचे पालन करणे आवश्यक आहे.<br>**गट-ड संवर्गातील पुनर्जीवित केलेल्या पदांची बिंदुनामावली ठेवण्याची आवश्यकता नाही.** |
| ७ | अनुकंपा प्रतिक्षासूचीतील उमेदवार अनुकंपा नियुक्तीसाठी उपलब्ध असलेल्या रिक्त पदासाठीची शैक्षणिक/तांत्रिक अर्हता धारण करीत नसेल व प्रतिक्षासूचीवरील पुढील उमेदवार सदर अर्हता धारण करीत असेल प्रतिक्षासूचीतील ज्येष्ठ उमेदवाराची ज्येष्ठता डावलून त्यापुढील उमेदवाराचा | प्रतिक्षासूचीतील उमेदवार हा अनुकंपा नियुक्तीसाठी उपलब्ध असणाऱ्या विविध संवर्गातील रिक्त पदांपैकी तांत्रिक संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमातील शैक्षणिक/तांत्रिक अर्हता धारण करीत नसेल तर त्याच्याऐवजी प्रतिक्षासूचीवरील पुढील उमेदवाराचा अनुकंपा नियुक्तीसाठी विचार करता येईल. |

| | | |
|---|---|---|
| | अनुकंपा नियुक्तीसाठी विचार करता येईल किंवा कसे ? | |
| ८ | अनुकंपा प्रतिक्षासूचीवरील उमेदवाराने समुपदेशनाच्या वेळी शैक्षणिक व इतर अर्हतेनुसार नियुक्तीसाठी पात्र ठरत असलेल्या उपलब्ध सर्व पदांवर पसंतीक्रम न दर्शविता एक किंवा दोनच पदांसाठी पसंतीक्रम दर्शविला असून सदर पदे संबंधित उमेदवारास ज्येष्ठतेनुसार उपलब्ध होत नसतील तर त्याने पसंतीक्रम न दर्शविलेल्या पदावर अशा उमेदवाराची शिफारस करावी किंवा कसे? | अनुकंपा नियुक्ती योजनेचा मूळ उद्देश हा दिवंगत कर्मचाऱ्याच्या कुटुंबावर ओढावणाऱ्या आर्थिक आपत्तीत तातडीने मदत मिळणे हा आहे.<br>समुपदेशनाच्या वेळी अनुकंपा प्रतिक्षासूचीवरील उमेदवाराने दिलेल्या पदांच्या पसंतीक्रमानुसार पदे उपलब्ध होत नसतील तर त्याच्या पात्रतेनुसार संबंधित गटातील जे पद उपलब्ध होत असेल त्या पदावर नियुक्तीची शिफारस करण्यात यावी.<br>अशा प्रकारे उमेदवाराची शिफारस केल्यानंतर नियुक्ती स्विकारण्यासाठी विहित केलेल्या कालावधीत उमेदवार सदर पदावर रुजू न झाल्यास त्याला अनुकंपा नियुक्तीमध्ये स्वारस्य नाही असे समजून त्याचे नाव अनुकंपा प्रतिक्षासूचीमधून वगळण्यात यावे. |
| ९ | अनुकंपा नियुक्ती धोरणाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींबाबत दि.२२.०८.२०२५ च्या परिपत्रकान्वये मार्गदर्शन करण्यात आले आहे. त्यामधील मुद्दा क्र.२ मध्ये दिलेल्या स्पष्टीकरणानुसार आकृतीबंध अद्याप मंजूर नाही अशी कार्यालये तसेच ज्या कार्यालयांचा आकृतिबंध सुधारीत करण्यात आला आहे व गट-ड मध्ये काही संवर्गातील पदांना नियमित पदे म्हणून मान्यता देण्यात आली आहे अशा कार्यालयांच्या नियुक्ती प्राधिकारी यांनी गट-ड संवर्गातील पद पुनर्जीवित करण्याची आवश्यकता नाही व त्यांचेकडील सरळसेवेची सर्व रिक्त पदे प्रतिक्षासूचीतील उमेदवारांच्या संख्येच्या मर्यादेत अनुकंपा तत्त्वावर भरता येतील. | शासन परिपत्रक, दि.२२.०८.२०२५ मधील मुद्दा क्र.२ येथे स्पष्ट केल्यानुसार आकृतिबंध अद्याप मंजूर नाही अशी कार्यालये तसेच आकृतिबंध सुधारित करण्यात आला आहे व गट-ड मध्ये काही संवर्गातील पदांना नियमित पदे म्हणून मान्यता देण्यात आली आहे अशा कार्यालयाच्या नियुक्ती प्राधिकारी यांनी गट-ड संवर्गातील सरळसेवेची सर्व रिक्त पदे प्रतिक्षासूचीतील उमेदवारांच्या संख्येच्या मर्यादेत अनुकंपा तत्त्वावर भरावीत.<br>अशा प्रकारे कार्यवाही करताना पदे रिक्त राहत असल्यास नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी ती संबंधित जिल्हाधिकारी यांना कळवावीत. |
| १० | कार्यालय प्रमुखाकडून उमेदवाराचे नाव अनुकंपा नियुक्तीच्या सामायिक प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ट करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे विलंबाने प्राप्त झाला असेल अथवा जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रस्ताव विहित कालावधीत प्राप्त होऊनही सामायिक प्रतिक्षासूचीमध्ये उमेदवाराचे नाव | गट-क साठी अनुकंपा नियुक्ती धोरणाच्या शासन निर्णयातील परिच्छेद (V) मधील तरतूदीनुसार कार्यालय प्रमुखाने उमेदवाराचा परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर व उमेदवाराच्या अर्हतेनुसार त्याचा गट निश्चित केल्यानंतर लगेचच सामायिक प्रतिक्षासूचीत नाव समाविष्ट करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविणे आवश्यक आहे.<br>तथापि, काही कारणास्तव जिल्हाधिकारी कार्यालयास प्रस्ताव विलंबाने प्राप्त झाला असेल अथवा |

| | | |
|---|---|---|
| | समाविष्ट करण्यास जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विलंब झाला असेल तर अशाप्रकरणी उमेदवाराचे नाव कोणत्या दिनांकास प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ट करावे ? | जिल्हाधिकारी कार्यालयास विहित कालावधीत प्रस्ताव प्राप्त होवूनही सामायिक प्रतिक्षासूचीमध्ये उमेदवाराचे नाव समाविष्ट करण्यास जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विलंब झाला असेल, तर कार्यालय प्रमुखाने परिपूर्ण अर्ज सादर केल्याचा जो दिनांक प्रस्तावात नमूद केला आहे त्या दिनांकास जिल्हाधिकारी कार्यालयाने उमेदवाराचे नाव सामायिक प्रतिक्षासूचीत समाविष्ट करावे. |
| ११ | अनुकंपा नियुक्तीसाठी आरक्षण संवर्गामध्ये खुल्या पदावर प्रतिक्षासूचीतील ज्येष्ठता विकल्पानुसार आरक्षीत प्रवर्गातील उमेदवाराची शिफारस करण्यात आल्यास, नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी सदर आरक्षित प्रवर्गातील उमेदवारास प्रथमत: खुल्या पदावर नियुक्ती देऊन भविष्यात उपलब्ध होणाऱ्या आरक्षीत बिंदूवर समायोजित करता येईल किंवा कसे ?<br>तसेच आरक्षित प्रवर्गातील उमेदवारास खुल्या प्रवर्गाच्या बिंदूवर नियुक्ती देण्यात आल्यास बिंदू नामावली तपासून घेण्याची आवश्यकता आहे काय ? | अनुकंपा नियुक्तीसाठी आरक्षण संवर्गामध्ये खुल्या पदावर प्रतिक्षासूचीतील ज्येष्ठता विकल्पानुसार आरक्षीत प्रवर्गातील उमेदवाराची शिफारस करण्यात आल्यास नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी सदर उमेदवारास प्रथमत: खुल्या पदावर नियुक्ती देऊन भविष्यात उपलब्ध होणाऱ्या आरक्षीत बिंदूवर समायोजित करता येईल.<br>आरक्षीत उमेदवारास खुल्या प्रवर्गातून नियुक्ती देण्यात आल्यास बिंदू नामावली तपासून घेण्याची आवश्यकता नाही. |

************

**अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक सुधारित धोरणाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींबाबत मार्गदर्शन.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: अकंपा-१२२५/प्र.क्र.१९४/म.लो.आ.**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २२ ऑगस्ट, २०२५

**संदर्भ:-** १. शासन निर्णय क्र.अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ., दि.१७ जुलै, २०२५
२. शासन परिपत्रक क्रमांक: अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ., दि.१७ जुलै, २०२५

**परिपत्रक:-**

अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक सुधारीत धोरण दि.१७ जुलै, २०२५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले असून संदर्भाधीन क्र.२ येथील परिपत्रकान्वये अनुकंपा नियुक्तीच्या अनुषंगाने उपस्थित होणारे प्रश्न व त्यांची उत्तरे (FAQ) निर्गमित करण्यात आली आहेत.

सुधारित अनुकंपा नियुक्ती धोरणानुसार कार्यवाही करताना उद्भवणाऱ्या अडचणींच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्याबाबत विविध नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी विनंती केली आहे. नियुक्ती प्राधिकाऱ्यांना उद्भवणाऱ्या अडचणींबाबत उपस्थित केलेल्या मुद्दे व त्यावरील स्पष्टीकरण याबाबतचे परिशिष्ट-अ सोबत जोडण्यात आले आहे.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२५०८२२१८१५३००००७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUCHITA MOHAN MAHADIK

Digitally signed by SUCHITA MOHAN MAHADIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=6578e224c4a0d2c9bfb7e7e33b474757c1425d0a03e653bc4f0a25b70698158e, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E146A6DDC8FB6681D49A5099661D41639DA6C568419F071BB9CDFD8A2E0805BC, cn=SUCHITA MOHAN MAHADIK
Date: 2025.08.22 18:17:13 +05'30'

**(सुचिता महाडिक)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :-**

१) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालयामधील गट-क व गट-ड च्या सर्व नियुक्ती प्राधिकारी यांना सदर परिपत्रक अवगत करावे.
२) सर्व विभागीय आयुक्त
३) सर्व जिल्हाधिकारी

Scanned with OKEN Scanner

## शासन परिपत्रक क्र. अकंपा- १२२५/प्र.क्र. १९४/म.लो.आ., दि.२२ ऑगस्ट, २०२५ सोबतचे परिशिष्ट- अ

सुधारीत अनुकंपा नियुक्ती धोरणाच्या अनुषंगाने उपस्थित मुद्दे व त्यावरील स्पष्टीकरण

| अ. क्र. | मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १ | प्रतिक्षासूचीवरील उमेदवारांना नियुक्ती देण्यासाठी सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून रिक्त पदांची माहिती शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट फ मधील नमुन्यात संकलित करावयाची आहे. सदर परिशिष्टामध्ये संबंधित उमेदवाराच्या जात प्रवर्गाचा उल्लेख नसल्याने नियुक्ती देताना उमेदवारांना कोणत्या प्रवर्गात नियुक्ती द्यायची व त्यांचा बिंदू नामावलीत बिंदू कोणता दर्शवावा याचा बोध होत नाही.<br>यास्तव दिनांक १७ जुलै, २०२५ च्या शासन निर्णयानुसार राज्य शासकीय कार्यालयाकडून अनुकंपा नियुक्तीसाठी संबंधित निवडसूची वर्षातील सरळसेवा कोट्यातील रिक्त पदांच्या २०% पदांची गणना करताना प्रवर्गनिहाय मागणी करणे उचित ठरेल काय | अनुकंपा नियुक्ती ही प्रतिक्षासूचीतील ज्येष्ठतेनुसार करण्यात येते त्यामुळे शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-फ मधील नमुन्यात संकलित करावयाच्या माहितीमध्ये प्रवर्गाचा उल्लेख करण्यात आलेला नाही.<br>तथापि, मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदावर खुल्या प्रवर्गाच्या उमेदवाराची नियुक्ती करता येत नसल्याने प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना अडचण येवू नये यासाठी रिक्त पदांची माहिती मागविताना ती प्रवर्गनिहाय मागविण्यात यावी. |
| २ | सुधारीत अनुकंपा धोरणानुसार शासन निर्णयाच्या दिनांकापासून दोन वर्षासाठी गट-ड च्या सरळसेवा कोट्यातील प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या २०% पदावर अनुकंपा नियुक्ती देण्याची मर्यादा शिथिल करून गट-ड मध्ये जेवढी पदसंख्या मृत घोषित केली आहे त्या पदसंख्येच्या मर्यादेत अनुकंपा नियुक्तीसाठी पदे पुनर्जीवित करून गट-ड मधील पदे भरण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे.<br>तथापि, ज्या कार्यालयांचा आकृतिबंध सुधारित करण्यात आलेला नाही अथवा आकृतिबंध सुधारित झाला आहे तथापि गट-ड मधील काही संवर्गातील पदांना नियमित पदे | शासन निर्णय वित्त विभाग, दिनांक ११.२.२०१६ नुसार सर्व विभागांना आकृतिबंध सुधारीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यास्तव, सन २०१६ नंतर आतापर्यंत सर्वच विभागांचा सुधारीत आकृतिबंध मंजूर होणे अपेक्षित होते. तथापि, अद्याप काही कार्यालयांचा आकृतिबंध सुधारित झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे.<br>ज्या कार्यालयांचा आकृतिबंध सुधारित झाला असून गट-ड मधील काही संवर्गातील पदांना नियमित पदे म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे अशा कार्यालयांतील गट-ड च्या सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदांवर २०% ची मर्यादा २ वर्षांकरीता शिथील करुन गट-ड च्या प्रतिक्षासूचीतील उमेदवारांना नियुक्त्या देण्यात याव्यात.<br>ज्या कार्यालयांचा सुधारीत आकृतिबंध अद्याप मंजुर झालेला नाही अशा कार्यालयांतील गट-ड च्या सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदांवर **एक वेळची बाब म्हणून २०% ची मर्यादा शिथील करुन गट-ड च्या प्रतिक्षासूचीतील उमेदवारांना** |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे अशा कार्यालयांनी गट-ड पदावर अनुकंपा नियुक्ती देताना पदांची गणना कशी करावी. | **नियुक्त्या देण्यात याव्यात. अशा कार्यालयांनी आकृतिबंध सुधारीत करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी.** |
| ३ | गट-ड संवर्गातील पदे पुनर्जीवित केल्यानंतर, पुनर्जीवित केलेल्या पदांची स्वतंत्र बिंदुनामावली प्रमाणित करावी किंवा कसे? | गट-ड वरील अनुकंपा नियुक्तीसाठी पुनर्जीवित केलेले पद हे त्या पदावर सदर व्यक्ती कार्यरत असेपर्यंतच अस्तित्वात असणार आहे. त्या व्यक्तीच्या सेवानिवृत्ती/पदोन्नतीमुळे ते पद रिक्त झाल्यावर पुन्हा मृत होणार आहे. त्यामुळे पुनर्जीवित केलेल्या पदांची स्वतंत्र बिंदुनामावली करण्याची आवश्यकता नाही. |
| ४ | सा.प्र.वि., शासन निर्णय दि.२१.०९.२०१७ मधील मुद्दा क्र.१६ नुसार गट-क मधील पदावर अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्याला पदाच्या उपलब्धते अभावी गट-ड पदावर नियुक्ती दिल्यास पद उपलब्ध होताच गट-क मधील पदावर त्याला प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी अशी तरतूद आहे. तथापि, अनुकंपा सुधारित धोरणाच्या शासन निर्णय दि.१७.०७.२०२५ मध्ये तशी तरतूद नसल्याने दि.२१.०९.२०१७ च्या शासन निर्णयातील उपरोक्त तरतूदीनुसार गट-ड पदावर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना गट-क चे पद उपलब्ध झाल्यानंतर गट-क पदावर नियुक्ती देता येईल किंवा कसे. | शासन निर्णय दि.२१.०९.२०१७ च्या तत्कालीन अनुकंपा धोरणामध्ये गट-क च्या अनुकंपा प्रतिक्षासूचीतील उमेदवारास पद उपलब्धतेअभावी गट-ड मध्ये नियुक्ती दिल्यास पद उपलब्ध होताच गट-क मधील पदावर प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी अशी तरतूद होती. सुधारित धोरणानुसार जिल्हयातील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडील गट-क पदासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडूनच शिफारशी करण्यात येणार असल्याने गट-क वर अनुकंपा नियुक्तीसाठी पदे उपलब्ध होणार असल्याने गट-क च्या प्रतिक्षासूचीवरील उमेदवाराचा प्रतिक्षेचा कालावधी कमी होणार आहे. त्यामुळे सदर तरतूद सुधारित धोरणामध्ये समाविष्ट करण्यात आलेली नाही.<br>तथापि, तत्कालीन तरतूदीनुसार दि.१७ जुलै, २०२५ पूर्वी गट-क मधील पदाच्या अनुपलब्धतेमुळे उमेदवारास गट-ड मधील पदावर नियुक्ती दिली असल्यास गट-क मधील पद उपलब्ध झाल्यावर त्याला गट-क मधील पदावर नियुक्ती देता येईल. |
| ५ | काही नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे कार्यक्षेत्र एकापेक्षा जास्त जिल्हयांमध्ये म्हणजेच राज्य अथवा विभाग स्तरावर आहे. अशा नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी रिक्त पदांची माहिती कळविताना ती कोणत्या जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांना कळवावी. | गट-क च्या ज्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे कार्यक्षेत्र एकापेक्षा जास्त जिल्हयांमध्ये आहे अशा नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या आस्थापनेवर त्यावर्षी रिक्त होणाऱ्या सरळसेवेच्या एकूण पदांच्या २०% पदांची शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केल्यानुसार निश्चिती करावी. त्या संवर्गाच्या एकूण मंजूर पदांपैकी रिक्त पदांचा जिल्हानिहाय आढावा घ्यावा आणि अशा रिक्त पदांच्या प्रमाणात २०% नुसार निश्चित केलेली अनुकंपा धोरणामार्फत भरावयाची पदे वाटावीत. हे करत असताना सदरची २०% नुसार आलेली संख्या न बदलता अपूर्णांकाचे जवळच्या पूर्णांकामध्ये जिल्हानिहाय रुपांतर करावे आणि ती पदे |



Scanned with OKEN Scanner

<table>
<tr><td></td><td></td><td>भरण्यासाठी त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांना कळवावीत.<br><u>उदा:-</u> एका नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात ५ कार्यालये ५ जिल्हयांमध्ये आहेत. सदर कार्यालयांतील निवडसूची वर्षात रिक्त झालेल्या पदांची एकूण संख्या ६५ आहे. सदर रिक्त ६५ पदांच्या २०% म्हणजे १३ पदे अनुकंपा नियुक्तीसाठी उपलब्ध होतात. सदर रिक्त पदे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना खालीलप्रमाणे कळविण्यात यावीत.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>कार्यालय असलेला जिल्हा</th><th>रिक्त पदे</th><th>रिक्त पदांच्या २०%</th><th>जिल्हाधिकारी कार्यालयास कळवावयाची पदसंख्या</th></tr>
<tr><td>१</td><td>पुणे</td><td>१४</td><td>२.८</td><td>३</td></tr>
<tr><td>२</td><td>सातारा</td><td>१७</td><td>३.४</td><td>३</td></tr>
<tr><td>३</td><td>सांगली</td><td>१२</td><td>२.४</td><td>२</td></tr>
<tr><td>४</td><td>सोलापूर</td><td>९</td><td>१.८</td><td>२</td></tr>
<tr><td>५</td><td>कोल्हापूर</td><td>१३</td><td>२.६</td><td>३</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td>६५</td><td></td><td>१३</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>६</td><td>जर एखाद्या कर्मचाऱ्याचे कुटुंब तो मृत्यूसमयी कार्यरत असलेल्या जिल्हयाव्यरिक्त अन्य जिल्हयात स्थायिक असेल तर उमेदवाराचे नाव कोणत्या जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रतिक्षासूचीत समाविष्ट करावे.</td><td>सन १९९४ च्या अनुकंपा नियुक्ती योजनेनुसार दिवंगत कर्मचारी ज्या कार्यालयात कार्यरत होता त्या कार्यालयानेच अनुकंपा नियुक्तीची कार्यवाही सुरु करावयाची होती. सदर तरतूद दि.१७.७.२०२५ च्या सुधारीत धोरणामध्ये कायम ठेवण्यात आली आहे. त्यानुसार कर्मचारी ज्या जिल्हयात कार्यरत असताना दिवंगत झाला त्या जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांकडील प्रतिक्षासूचीत उमेदवाराचे नाव समाविष्ट करणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>७</td><td>अनुकंपा नियुक्तीसाठी रिक्त पदांची गणना करताना विचारात घ्यावयाचा कालावधी कोणता असावा.</td><td>अनुकंपा नियुक्तीसाठी रिक्त पदांची गणना करताना संबंधित निवडसूची वर्ष म्हणजेच १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट या कालावधीतील रिक्त पदे विचारात घ्यावीत.</td></tr>
<tr><td>८</td><td>कार्यालय प्रमुखांकडून सामायिक प्रतिक्षासूचीमध्ये नाव समाविष्ट करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास विलंबाने प्राप्त झाल्यास उमेदवाराचे नाव कोणत्या दिनांकास प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ट करावे.</td><td>गट-क साठी अनुकंपा नियुक्ती धोरणाच्या शासन निर्णयातील परिच्छेद (V) मधील तरतूदीनुसार कार्यालय प्रमुखाने उमेदवाराचा परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर व उमेदवाराच्या अर्हतेनुसार त्याचा गट निश्चित केल्यानंतर लगेचच सामायिक प्रतिक्षासूचीत नाव समाविष्ट करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविणे आवश्यक आहे.<br>तथापि, काही कारणास्तव जिल्हाधिकारी कार्यालयास प्रस्ताव विलंबाने प्राप्त झाला तर जिल्हाधिकारी कार्यालयाने, कार्यालय प्रमुखाने परिपूर्ण अर्ज सादर केल्याचा जो दिनांक प्रस्तावात नमूद केला आहे त्या दिनांकास उमेदवाराचे नाव सामायिक प्रतिक्षासूचीत समाविष्ट करावे.</td></tr>
</table>



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| ९ | गृह विभागाच्या दि.२३.०२.२००४ च्या शासन निर्णयानुसार पोलीस दलातील अनुकंपा तत्त्वावरील पोलीस शिपाई (गट-क) व वर्ग-ड पदावरील उमेदवारांची प्रतिक्षायादी जिल्हाधिकारी स्तरावर न ठेवता संबंधित पोलीस आयुक्त/जिल्हा पोलीस अधिक्षक या कार्यालयाकडे ठेवण्यात येते. याबाबत सुधारित अनुकंपा धोरणामध्ये काय तरतूद आहे. | गृह विभागाच्या दि.२३.०२.२००४ च्या शासन निर्णयानुसार अनुकंपा नियुक्तीबाबत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीमध्ये सुधारित अनुकंपा धोरणामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.<br>तथापि, पोलीस शिपाई (गट-क) पदा व्यतिरिक्त इतर गट-क मधील पदांसाठी अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची नावे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सामायिक प्रतिक्षासूचीत समाविष्ट करण्यासाठी पाठविण्यात यावीत. तसेच पोलीस घटकांकडील गट-क मधील, पोलीस शिपाई (गट-क) व्यतिरिक्त, अनुकंपा नियुक्तीसाठी उपलब्ध असलेल्या इतर रिक्त पदांची माहिती संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात यावी. |

*************



Scanned with OKEN Scanner